17 JUL 2025

सकाळ


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी प्रबोधन पुरुष

## किशोर बेडकीहाळ : विद्यापीठातील परिषदेत डॉ. लवटे यांचा गौरव

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. १६ : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे अखिल मानवमात्राच्या कल्याणासाठी ज्ञाननिर्मिती करणारे आणि त्याचा वापरही करणारे विसाव्या शतकातील महत्त्वाचे प्रबोधन पुरुष होते. स्वतःच्या बौद्धिक स्वातंत्र्याबद्दल अत्यंत जागरूक असणाऱ्या शास्त्रीजींनी सर्व प्रकारचे ज्ञानग्रहण करून नव्या काळाला अनुकूल असे त्या ज्ञानाचे उपयोजन करण्यास प्राधान्य दिले. त्यांच्या या कार्याचे आकलन, अनुसरण करण्याची आज गरज आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकीहाळ यांनी आज येथे केले.**





कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या विचार व कार्यावर आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेत डॉ. सुनीलकुमार लवटे यांचा विशेष गौरव करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. यावेळी डावीकडून डॉ. प्रकाश पवार, अशोक जोशी, अशोक खंडकर, किशोर बेडकीहाळ, पंडित टापरे आदी.

शिवाजी विद्यापीठातील गांधी अभ्यास केंद्र आणि वाई येथील तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी प्रतिष्ठानतर्फे 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे विचार व कार्य' या विषयावरील दोनदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी बीजभाषण करताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, तर तर्कतीर्थांचे पुतणे व अमेरिकेतील वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अशोक जोशी, नातू डॉ. अशोक खंडकर प्रमुख उपस्थित होते.

डॉ. जोशी म्हणाले, "तर्कतीर्थ यांच्याकडे मी नेहमीच विचारमहर्षी म्हणून पाहिले. त्यांनी नेहमी आम्हा कुटुंबीयांना बुद्धांचा सुखाचा मंत्र सांगितला. आपल्या डोक्यात नेहमी अमर विचार आले पाहिजेत, असे ते सांगत."

डॉ. खंडकर म्हणाले, "तर्कतीर्थांच्या ज्ञानाचा, ज्ञानसाधनेचा वारसा पुढे चालविण्याची जबाबदारी आजच्या अभ्यासक, संशोधकांनी उचलली पाहिजे."

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, "तर्कतीर्थांच्या व्यक्तिमत्त्वाच्या अगदी एखादा पैलू जरी आजच्या विद्यार्थ्यांनी आत्मसात केला, तरी त्यांचे आयुष्यभराचे कल्याण होऊन जाईल. डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी तर्कतीर्थांच्या विचारकार्याचे एकहाती संपादित केलेले १८ खंडही भारतीय साहित्य-संस्कृती क्षेत्राला फार मोठी देणगी आहे."

डॉ. सुनीलकुमार लवटे यांचा शाल, ग्रंथ आणि मानपत्र भेट देऊन विशेष गौरव करण्यात आला. 'मराठी विश्वकोश' आणि 'साहित्य आणि संस्कृती' पुस्तिकांचे प्रकाशन झाले. गांधी अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. प्रकाश पवार यांनी स्वागत केले. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी प्रतिष्ठानचे अध्यक्ष पंडित टापरे, अनिल मेहता, डॉ. श्रीराम पवार, डॉ. दिलीप करंबेळकर, राजा दीक्षित, कौतिकराव ठाले-पाटील, अनुराधा पाटील, रणधीर शिंदे, नंदकुमार मोरे, शरद गायकवाड, अवनीश पाटील, प्रभंजन माने, जी. पी. माळी, विश्वास सुतार, प्रवीण बदिकर उपस्थित होते. अक्षय जहागीरदार यांनी मानपत्राचे वाचन केले. सुखदेव एकल, प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुखदेव उंदरे यांनी आभार मानले.

दरम्यान, दुपारच्या सत्रात 'मराठी विश्वकोशातील नोंदींचा अन्वय' या विषयावरील परिसंवादात विश्वकोश निर्मिती मंडळाचे माजी अध्यक्ष दिलीप करंबेळकर आणि प्रा. राजा दीक्षित यांनी सहभाग घेतला. ज्येष्ठ पत्रकार डॉ. श्रीराम पवार अध्यक्षस्थानी होते. त्यानंतरच्या सत्रात डॉ. रणधीर शिंदे, ज्येष्ठ संशोधक सर्फराज अहमद, मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष कौतिकराव ठाले-पाटील यांनी विचार मांडले.

### निःशस्त्र परिवर्तनानेच हृदयपरिवर्तन शक्य

**तर्कतीर्थ यांच्या विचारकार्याची नव्याने मीमांसक मांडणी होण्याची गरज आहे. निःशस्त्र परिवर्तनानेच माणसाचे हृदयपरिवर्तन शक्य आहे. या हृदयपरिवर्तनातूनच भारत एक होईल. यासाठी सर्वंकष प्रयत्नांची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी येथे केले. त्यांची विशेष मुलाखत डॉ. नंदकुमार मोरे आणि डॉ. नागोराव कुंभार यांनी घेतली.**

### प्रदर्शनातून तर्कतीर्थांच्या बहुआयामी कार्याचे दर्शन

या परिषदेच्या निमित्ताने विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात तर्कतीर्थ यांच्या बहुआयामी कार्याचे दर्शन घडविणारे विशेष प्रदर्शन भरविले आहे. त्यात तर्कतीर्थांनी लिहिलेले ग्रंथ, संपादित केलेले ग्रंथ, विश्वकोशाचे सर्व खंड, त्यांच्याविषयीचे लेखन, चरित्रग्रंथ यासह डॉ. लवटे यांनी संपादित केलेले १८ खंड त्याचप्रमाणे तर्कतीर्थांचे जीवनदर्शन घडविणारी विविध छायाचित्रे, लेख आदींची मांडणी केली आहे.


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

17 JUL 2025

तरुण भारत

# तर्कतीर्थांनी ज्ञाननिष्ठेचे रूपांतर समाजनिष्ठेत केले

## ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकीहाळ : आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे विचार आणि कार्य'वरील आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन बुधवारी झाले. याप्रसंगी पुस्तिकांचे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत डॉ. प्रकाश पवार, डॉ. सुनीलकुमार लवटे, डॉ. अशोक जोशी, डॉ. अशोक खंडकर, किशोर बेडकीहाळ, डॉ. पंडित टापरे.

प्रतिनिधी
कोल्हापूर

मानवाच्या कल्याणासाठी ज्ञाननिर्मिती करणारे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी होते. त्यांनी ज्ञाननिष्ठेचे रूपांतर समाजनिष्ठेत केले. म्हणूनच ते विसाव्या शतकातील महत्वाचे प्रबोधनपुरूष होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकीहाळ यांनी केले. शिवाजी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय परिषदेत बुधवारी ते बोलत होते.

- **तर्कतीर्थांचे विचार आणि कार्य'वर विद्यापीठात परिषद**

विद्यापीठातील गांधी अभ्यास केंद्र आणि वाई (जि. सातारा) येथील तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे विचार आणि कार्य' यावरील आंतरराष्ट्रीय परिषदेला बुधवारी शिवाजी विद्यापीठात प्रारंभ झाला. या परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. व्यासपीठावर डॉ. प्रकाश पवार, डॉ. अशोक जोशी, डॉ. सुनीलकुमार लवटे, डॉ. अशोक खंडकर, प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. पंडित टापरे उपस्थित होते.

बेडकीहाळ म्हणाले, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी फुले, रानडे, आगरकर, शिंदे, टिळक यांचा प्रबोधनाचा वारसा प्रवाहित केला. आधुनिक प्रबोधन पर्वात कूस बदलणाऱ्या महाराष्ट्राचे ते साक्षीदार होते.

**गौतम बुद्धांचा सुखाचा मार्ग**

तर्कतीर्थ जोशींचे पुतणे डॉ. अशोक जोशी म्हणाले, तर्कतीर्थांकडे नेहमीच विचारमहर्षी म्हणून पाहिले. त्यांनी नेहमी कुटुंबियांना गौतम बुद्धांचा सुखाचा मंत्र सांगितला. आपल्या डोक्यात नेहमी अमर विचार आले पाहिजेत, असे ते सांगत. अस्पृश्यता निवारण अमर विचार असतो, असे ते म्हणत. त्यांच्यामुळेच कुटुंबातील सर्वांनी आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह केले आहेत.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, तर्कतीर्थांच्या व्यक्तिमत्वाचा एखादा पैलू आत्मसात केला, तरी कल्याण होईल. तर्कतीर्थ इंग्रजी शिकण्यासाठी वेषांतर करून बडोद्याला गेले. तीन महिन्यांत इंग्रजी शिकले. त्यांनी निर्माण केलेले ज्ञानसंचित अफाट आहे.

डॉ. खंडकर म्हणाले, आजोबांचा सर्वात थोरला, त्यांच्याशी मैत्री असणारा नातू आहे. भारताच्या आध्यात्मिक, सामाजिक विकासात त्यांनी योगदान दिले.

डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी तर्कतीर्थांच्या विचारकार्याचे एकहाती संपादित १८ खंड आहेत. ही भारतीय साहित्य-संस्कृतीला मोठी देणगी असल्याचे सांगितले.

अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. प्रकाश पवार यांनी स्वागत केले. अक्षय जहागीरदार यांनी मानपत्राचे वाचन केले. सुखदेव एकल, प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुखदेव उंदरे यांनी आभार मानले. यावेळी अनिल मेहता, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. शरद गायकवाड, डॉ. अवनीश पाटील, डॉ. प्रभंजन माने, डॉ. जी. पी. माळी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 JUL 2025
सकाळ

**प्रदर्शन :** तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी आंतरराष्ट्रीय परिषदेनिमित्त तर्कतीर्थांच्या जीवनकार्यावर आधारित प्रदर्शन. स्थळ : राजमाता जिजाऊसाहेब सभागृह, शिवाजी विद्यापीठ. वेळ : सकाळी दहा वाजता.

17 JUL 2025
लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लक्ष्मणशास्त्री विसाव्या शतकातील महत्त्वाचे प्रबोधनपुरुष

## किशोर बेडकीहाळ : विद्यापीठात आंतरराष्ट्रीय परिषदेस प्रारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे अखिल मानवमात्राच्या कल्याणासाठी ज्ञाननिर्मिती करणारे आणि त्याचा वापरही करणारे विसाव्या शतकातील महत्त्वाचे प्रबोधनपुरुष होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकीहाळ यांनी बुधवारी केले.

शिवाजी विद्यापीठाचे गांधी अभ्यास केंद्र आणि वाई येथील तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी प्रतिष्ठान यांच्यावतीने 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे विचार व कार्य' या विषयावरील दोनदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. तर्कतीर्थांचे पुतणे आणि अमेरिकेतील वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अशोक जोशी आणि नातू डॉ. अशोक खंडकर हे प्रमुख उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. अशोक खंडकर, डॉ. अशोक जोशी, किशोर बेडकीहाळ, डॉ. प्रकाश पवार उपस्थित होते.

बेडकीहाळ म्हणाले, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे समाजजीवनाच्या सर्व क्षेत्रांशी जैविक अर्थाने जोडलेले व्यक्तिमत्त्व होते. एकोणिसाव्या शतकातील फुले, रानडे, आगरकर, शिंदे, टिळक यांचा प्रबोधनाचा वारसा विसाव्या शतकामध्ये प्रवाहित करून नवमहाराष्ट्राचा विचार देशाला प्रदान करणाऱ्या पिढीचे शास्त्रीजी सच्चे वारसदार ठरले.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, तर्कतीर्थांच्या व्यक्तिमत्त्वाच्या अगदी एखादा पैलू जरी आजच्या विद्यार्थ्यांनी आत्मसात केला, तरी त्यांचे आयुष्यभराचे कल्याण होऊन जाईल. यावेळी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुनीलकुमार लवटे यांचा विशेष गौरव करण्यात आला. डॉ. प्रकाश पवार यांनी स्वागत केले. यावेळी पंडित टापरे, अनिल मेहता, डॉ. दिलीप करंबेळकर, राजा दीक्षित, कौतिकराव ठाले-पाटील, अनुराधा पाटील, डॉ. रणधीर शिंदे उपस्थित होते.

### प्रदर्शन मांडणीचा वस्तुपाठ

शिवाजी विद्यापीठातील राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या बहुआयामी कार्याचे दर्शन घडविणाऱ्या विशेष प्रदर्शनाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले. एखाद्या प्रदर्शनाची नेमकी आणि आकर्षक मांडणी कशी असावी, याचा हे प्रदर्शन म्हणजे वस्तुपाठ असल्याचे गौरवोद्गार कुलगुरू डॉ. शिर्के यांनी काढले.

17 JUL 2025 लोकसत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तर्कतीर्थांची मीमांसा करणारा ग्रंथ प्रकाशनाच्या वाटेवर - डॉ. सुनीलकुमार लवटे

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**कोल्हापूर :** तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा आदरयुक्त दबदबा आणि त्यांचा चोख चिकित्सक प्रतिवाद यामुळे त्यांच्या विचारांची समकाळामध्ये अपेक्षित मीमांसा झाली नाही. तर्कतीर्थांच्या विचारांची उत्तरमीमांसा करणारा माझा ग्रंथ प्रकाशनाच्या वाटेवर आहे, असे ज्येष्ठ साहित्यिक, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मयाचे संपादक डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी बुधवारी येथे सांगितले.



सुनीलकुमार लवटे यांची मुलाखत घेताना डॉ. नागोराव कुंभार, डॉ. नंदकुमार मोरे.

शिवाजी विद्यापीठात आजपासून सुरू झालेल्या तर्कतीर्थांच्या विचारकार्यावरील आंतरराष्ट्रीय परिषदेच्या दुसऱ्या सत्रात डॉ. लवटे यांची मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे आणि 'विचारशलाका'चे संपादक डॉ. नागोराव कुंभार यांनी विशेष मुलाखत घेतली. त्यावेळी ते बोलत होते. डॉ. लवटे म्हणाले, तर्कतीर्थांनी परंपरा आणि आधुनिकतेचा उत्तम मेळ त्यांनी घातला. प्राचीन विचारविश्वाला आधुनिकतेची जोड देऊन त्यांना वैश्विक बनविले. सर्व ज्ञानशाखांमध्ये सुसंगती साधत सर्वांचा उद्देश मानवतावाद आहे, हे त्यांनी विचारकार्यातून स्पष्ट केले.

**'लोकसत्ता'ची मालिका उपयुक्त**

डॉ. कुंभार म्हणाले, प्रज्ञावंतांचे साहित्य कसे संपादित करावे याचा मानदंड डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी निर्माण केला आहे.

'लोकसत्ता'मधील त्यांची मालिका तर्कतीर्थ समजून घेण्यास मार्गदर्शक ठरणारी आहे.

17 JUL 2025

लोकसत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रबोधनाच्या वारशाचे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी सच्चे वारसदार - किशोर बेडकीहाळ

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**कोल्हापूर :** तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे समाजजीवनाच्या सर्व क्षेत्रांशी जैविक अर्थाने जोडलेले व्यक्तिमत्त्व होते. एकोणिसाव्या शतकातील फुले, रानडे, आगरकर, शिंदे, टिळक यांचा प्रबोधनाचा वारसा विसाव्या शतकामध्ये प्रवाहित करून नवमहाराष्ट्राचा विचार देशाला प्रदान करणाऱ्या पिढीचे शास्त्रीजी सच्चे वारसदार ठरले, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकीहाळ यांनी बुधवारी येथे केले.




**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी विषयक आंतरराष्ट्रीय परिषदेत डॉ. सुनीलकुमार लवटे यांना मानपत्र देताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के. सोबत डॉ. प्रकाश पवार, डॉ. अशोक जोशी, डॉ. अशोक खंडकर, किशोर बेडकीहाळ, डॉ. पंडित टापरे. (छाया : प्रफुल्ल सप्रे)**

शिवाजी विद्यापीठाचे 'गांधी अभ्यास केंद्र' आणि वाई येथील 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी प्रतिष्ठान' यांच्या संयुक्त विद्यमाने 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे विचार व कार्य' या विषयावरील दोनदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी बीजभाषण करताना ते बोलत होते.

तर्कतीर्थांचे पुतणे, अमेरिकेतील वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अशोक जोशी म्हणाले, तर्कतीर्थ यांच्याकडे मी नेहमीच एक विचारमहर्षी म्हणून पाहिले. आम्ही आणि आमच्या मुलामुलींनीही सर्व प्रकारच्या भेदांना तिलांजली देत त्यांच्या विचाराचे अनुसरण केले आहे.

तर्कतीर्थांचे नातू डॉ. अशोक खंडकर यांनी भारताच्या आध्यात्मिक, सामाजिक विकासात योगदान देत असताना येथील सामाजिक-आर्थिक विषमतेची दरी कमी व्हावी, यासाठी शास्त्रीजींनी प्रयत्न केल्याचे सांगितले. कुलगुरू डॉ. शिर्के आपल्या अध्यक्षीय मनोगतात म्हणाले, तर्कतीर्थांच्या व्यक्तिमत्त्वाचा अगदी एखादा पैलू जरी आजच्या विद्यार्थ्यांनी आत्मसात केला, तरी त्यांचे आयुष्यभराचे कल्याण होऊन जाईल.

डॉ. सुनीलकुमार लवटे यांचा शाल, ग्रंथ आणि मानपत्र भेट देऊन गौरव करण्यात आला. 'मराठी विश्वकोश' आणि 'साहित्य आणि संस्कृती' या दोन पुस्तिकांचे प्रकाशन करण्यात आले. गांधी अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. प्रकाश पवार यांनी स्वागत केले. डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी प्रास्ताविक केले. तर्कतीर्थांच्या बहुआयामी कार्यांचे दर्शन घडविणाऱ्या प्रदर्शनाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले.